जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय नांदेड हे खाजगी जागेत भाडयाने कार्यरत असलेल्या इमारतीच्या मासिक भाडयापोटी नव्याने वाजवी भाडे मुल्यांकनास मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः हिनिका २०१७/प्र क्र ३६५/आरोग्य -५

जी.टी.रुग्णालय आवार, १० वा मजला,
बी-विंग, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
तारीख: ०७ ऑगस्ट, २०१९

वाचा -

1. **वित्त विभाग, शासन निर्णय विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम दि. १५ मे २००९.**
2. **सह संचालक, आरोग्य सेवा (हि ह व ज रो) पुणे यांचे पत्र क्र जाक्रससंआसे/ किजरो/ लेखा ४/ कार्य भाडेकरार मंजूरी/ न क्र ५१ / २९१२७-२९/२०१७ दिनांक १३.०७.२०१७.**

प्रस्तावना -

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ अन्वये जिल्हा हिवताप अधिकारी नांदेड यांची सदर खाजगी जागेची मुदत दिनांक ३१.१२.२०१६ रोजी संपुष्टात आलेली असल्याने दिनांक १.०१.२०१७ ते ३१.१२.२०१९ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी प्रशासकीय मान्यता घेणेबाबतचा प्रस्ताव सह संचालकांनी शासनास सादर केला आहे . जिल्हा हिवताप कार्यालय नांदेड या कार्यालयासाठी योग्य अशी शासकीय इमारत नांदेड येथे उपलब्ध नाही. या अनुषंगाने या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय -

जिल्हा हिवताप कार्यालय नांदेड करिता सौ. लता श्रीपतराव चव्हाण (इमारत मालक) आनंदनगर नांदेड यांच्या मालकीची इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील ६१.३५ चौ. मी., दुसऱ्या मजल्यावरील ४१५.३५ चौ. मी. व तळमजला ६१.३५ चौ.मी. अशी एकत्रित ५३८.०५ चौ. मी. जागेसाठी दरमहा रुपये ५६८००/- इतका रक्कम दि.१.०१.२०१७ ते दि.३१.०८.२०१९ या कालावधीसाठी अदा करण्याच्या वाजवी भाडे पुनर्मुल्यांकनास पुढीलप्रमाणे अटींच्या अधीन राहुन या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

1. घरमालकाने करारात केलेल्या अटींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

२) इमारतीत आवश्यक त्या ठिकाणी बांधकाम ,डागडुजी व दरवर्षी रंगकाम करण्याची जबाबदारी इमारत मालकाची राहील.

३) इमारतीचा मिळकत कर/नगरपालिका/नगरपरिषद कर भरणे ही जबाबदारी सर्वस्वी इमारत मालकीची राहिल .

४) सदर कार्यालयास भविष्यात दि.३१.०८.२०१९ नंतर इमारतीच्या भाडे कराराबाबत नविन करार करण्यास किंवा मुदतवाढ देण्यास शासनाकडुन परवानगी देता येणार नाही.

५) तसेच सदर कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड यांच्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर दि.३१.०८.२०१९ पुर्वी स्थलांतर करणे आवश्यक राहिल.

६) तसेच सदर करारनामा भाडे करार कायदा व नोंदणी अधिनियम अंतर्गत शासकीय कार्यालयातर्फे दुय्यक निबंधक कार्यालयातर्फे नोंदणीकृत करण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम दि. १५ मे २००९ परिशिष्टातील भाग पहिला, उपविभाग -- १ मधील अनुक्रमांक १० येथील नियम क्रमांक ११५ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील नियम १४७(क) खालील टीप - एक नुसार प्रशासनिक विभागांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०६१६४३५०९६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e32592d7ee16b3f0ea3e5db304272db056899514ece7f762990f9b1a0c5049, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2e35734ec976bf5657815fb42c4d25b0b3c23b4c69600638f3deb172ac9e37f4, ou=PHD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN VASANTRAO WAHUL
Date: 2019.08.08 14:44:31 +05'30'

(किरण वाहूल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त आरोग्य सेवाआरोग्य भवन , , मुंबई.

२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा (हि ह व ज रो), पुणे.
४. जिल्हा कोषागार अधिकारी ,नांदेड.
५. जिल्हा हिवताप अधिकारी, नांदेड.
६. सहाय्यक संचालक, लेखा व लेखापरिक्षा, आरोग्य सेवा, पुणे
७. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
८. उप संचालक, आरोग्य सेवा लातूर मंडळ, लातूर
१०. सार्वजनिक आरोग्य विभाग, (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
११. निवडनस्ती (आरोग्य-५)